शैलेश पुरोहित

# नौकुचीयाताल









ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# नौकुचीयाताल

लेखक : शैलेश न. पुरोहित

# नौकुचीयाताल

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

नौकुचीयाताल

लेखक : शैलेश न. पुरोहित

ए/२, जस्मिन, संत रामदास मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०००८१.

टेली: ९८७०९९०७४३, ८४५२८०३६६३.

ई मेल : shain_p@rediffmail.com shainpu1208@gmail.com

छायाचित्रं : शैलेश, स्वराली व गंधर्व पुरोहित

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ४ फ़ेब्रुवारी २०२०

©esahity Pratishthan®2020

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.


- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

श्री. शैलेश पुरोहित यांचे अजून एक प्रवासवर्णन

इंद्रपुरी सिक्कीम

नक्की वाचा

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sikkim.pdf



# प्रस्तावना

२०११च्या दिवाळीत आम्ही नौकुचीयाताल (उत्तराखंड) येथे जाऊन आलो. त्या नंतर २०१३ मध्ये आमची गंगटोकची सफर झाली. ई साहित्यने सदर प्रवासवर्णन प्रकाशित केले. अनेक वाचकांनी प्रतिक्रिया पाठवल्या. लेखनाला हुरूप आला, मग वर्षभरात एक छोटासा कथा संग्रह लिहिला. तो ही ई साहित्यने प्रसिध्द केला. प्रतिक्रियांचा पाऊस पडला. त्यानंतर ताडोबा , पेंच ( आमच्या सोबत शिरीष, क्षितिजा, निलेंदू व सोनाली होते) , ऋषीकेश - देहरादून – मसुरी - धनोल्टी अशी उत्तराखंडची सफर झाली ( ती मात्र घाटे व वेलणकर दाम्पत्यांसोबत) . ताडोबा अभयारण्यात वाघाची आणि आमची तीन वेळा चुकामुक झाली ( कधी आम्ही निघून गेल्यावर त्याच आगमन व्हायचं. तर कधी आम्ही पोहोचण्या आधीच स्वारी निघून गेलेली असायची) नाही म्हणायला पहिल्याच सफारीला बिबट्याने दर्शन दिले. पेंचच्या मुक्कामातही आम्ही बेसावध असताना वाघीण आपल्या बछड्या सोबत आमच्या जीप समोरून गेली. उत्तराखंडला आम्ही आठजण होतो. एकंदरीत या सगळया सहलींचं लेखन झालं नाही हे खरं. या सगळया सहलींची जमेची बाजू म्हणजे फोटो, आम्ही भरपूर फोटो काढले.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे २०११ च्या दिवाळीत आम्ही नौकुचीयाताल (उत्तराखंड) येथे गेलो होतो. तेथले अनुभव आठ वर्षानंतर जसे आठवले तसे आपणासमोर ठेवतो. उत्तराखंड, निसर्गदत्त देणगी असणारे उत्तरेकडील राज्य. उत्तर प्रदेशात असूनही स्वभावाने गरीब, शांत प्रवृत्तीचे लोक. प्रवासाच्या पहिल्या दिवशीच अनपेक्षित असा अनुभव मिळाला तेवढाच. एकंदरीत प्रवास छान झाला. आजवरचे आमचे बहुतेक प्रवास दिवाळीच्या सुट्टीत किंवा भर दिवाळीत झालेले आहेत.

नौकुचीयातालचे प्रवास वर्णन लिहिण्याचा व ई साहित्याच्या माध्यमातून आपणापर्यंत पोहोचवण्याचा हा एक प्रयत्न. आवडल्यास जरूर कळवा. ई साहित्यने पुन्हा एकदा माझे छोटेखानी प्रवासवर्णन प्रकाशित करून माझा हुरूप वाढवल्याबद्दल ई साहित्यच्या टीमला मनापासून धन्यवाद .

आपला

शैलेश न. पुरोहित

मुलुंड (पूर्व), मुंबई. १० नोव्हेंबर २०१९



# माझ्या आजवरच्या साऱ्या सहपर्यटकांना अर्पण

# नौकुचीयाताल




## शैलेश न. पुरोहित



# नौकुचीयाताल

१५ एप्रिल २०११ च्या आसपास आम्ही, म्हणजे हेमंत व उल्का वेलणकर, अतुल व अर्पिता घाटे, श्रावणी व मी हेमंतच्या घरी म्हणजे ठाण्याला जमलो होतो, सभेचा ‘अजेंडा’ एका वाक्याचा म्हणजे ‘दिवाळीत कोठे तरी जायचे’ इतकाच. सुरुवातीलाच दिवाळीच्या सुट्टीत की भर दिवाळीत यावर खल झाला. आम्ही, म्हणजे पुरोहित भर दिवाळीत बाहेर गेल्याचा इतिहास नव्हता. अखेर तिकिटांचे दर व उपलब्धता लक्षात घेता भर दिवाळीतच जाण्याचे ठरले. हेमंत व श्रावणी आमच्या पायलट कार ते वेगवेगळी ठिकाणे शोधत व आमचा ‘सपोर्टिंव्ह स्टाफ’ त्या ठिकाणांना पूरक माहिती ( म्हणजे तेथे जायचे कसे, विमान, रेल्वे, बसची काही सोय आहे काय? असल्यास परवडणारी (!) आहे काय ? त्यांची उपलब्धता वगैरे, वगैरे ) शोधू लागला. उल्का - हेमंत आर सी आय व क्लब महिंद्र चे सभासद असल्याने टेकडी, कुर्ग, श्रीलंका करीत आमची विमाने पार Bangkok पर्यंत उडाली परंतु प्रत्येक ठिकाणी वेगवेगळ्या अडचणी निर्माण होत होत्या व आम्हाला दुसरीकडे मोर्चा वळवावा लागत होता. अखेर उत्तराखंड मधील ‘नौकुचीयाताल’, -- कानाला जरा वेगळे वाटले ना ? खरे सांगायचे तर, तिकडे जाईपर्यंत आमच्या मनात ह्या नावाचा उच्चार कसा करतात ह्या बाबत बराच गोंधळ होता -- , बिन्सर अथवा जिम कॉर्बेटची माहिती गोळा करण्यास लागलो. मागच्या वर्षीच हेमंत - उल्का बिन्सरला जाऊन आलेले असल्याने बिन्सर बाजूला पडले, लगेचच जिम कॉर्बेटच्या क्लब महिंद्रला फोन लावला आणि कॉर्बेट अभयारण्य जून ते १४ नोव्हेंबर पर्यंत बंद असल्याचे वर्तमान समजले. त्यावर्षी दिवाळी होती २५ ऑक्टोबरला म्हणजे जिम कॉर्बेटला जाऊन अभयारण्यात जायला मिळणार नव्हते, तेव्हा कॉर्बेटवर मोठी फुली मारून नौकुचीयातालला जायचे निश्चित केले.

नौकुचीयाताल हे उत्तराखंड राज्यात समुद्रसपाटीपासून १२९२ मीटर्सवर असणारे एक थंड हवेचे ठिकाण आहे. आता, नौकुचीयातालला कसे पोहोचायचे तर, मुंबईहून दिल्ली व पुढे रेल्वेने गेल्यास काठगोदाम पर्यंत व पुढे मोटारने जावे लागते व विमानाने गेल्यास मुंबई – दिल्ली - पंतनगर व पुढे रस्त्याने. सारासार विचार करून मुंबई दिल्ली विमानाने, पुढे त्याच रात्री सुटणाऱ्या रानीखेत एक्स्प्रेसने पहाटे

काठगोदाम गाठायचे व तिकडे ‘क्लब’ ची गाडी बोलवायची असे ठरले. काठगोदाम हे एक महत्वाचं स्थानक आहे जिम कॉर्बेट अभयारण्य, बिन्सर, नैनिताल, नौकुचीयाताल या ठिकाणी जायचे असल्यास काठगोदाम येथेच उतरावे लागते. क्लब महिंद्राचे बुकिंग १ मे ला उघडणार होते तेव्हा १ तारखेला सकाळीच हेमंतने बुकिंग करायचे ठरले. मुंबई – दिल्ली विमानाची ८ तिकिटे ( उल्का व हेमंत वेलणकर , अर्पिता व अतुल घाटे, स्वराली , गंधर्व,

श्रावणी व शैलेश पुरोहित ) काढली पुढे रात्रीचा दिल्ली – काठगोदाम प्रवास रेल्वेने व परतीचा प्रवास दिल्ली पर्यंत झायलोने व दिल्ली – मुंबई राजधानी एक्स्प्रेसने असा कार्यक्रम ठरला व त्याप्रमाणे बुकिंगची जबाबदारी वाटली गेली. मधल्या काळात हेमंतने क्लब महिंद्र बरोबर ‘ई पत्रव्यवहार’ करून स्थल दर्शन, वाहन व्यवस्था इत्यादी माहिती गोळा केली.

उत्तराखंड मध्ये तलावाला ‘ताल’ असे म्हणतात. म्हणजे, जेथे भीमाने स्नान केले ते ‘भीमताल’, नयनादेवीचे जेथे वास्तव्य होते तो तलाव ‘नैनिताल’, नऊ टोके असणारा तलाव तो ‘नौकुचीयाताल’. तर हा नौकुचीयाताल व आजूबाजूचा परिसर पाहण्यासाठी आम्ही ८ जण २३ ऑक्टोबर २०११ ला सकाळी साडे दहाच्या सुमारास दिल्लीकडे एअर इंडियाने निघालो. साडेबाराच्या सुमारास इंदिरा गांधी विमानतळावर पोहोचलो. दिल्लीच्या इंदिरा गांधी विमानतळावरून रिलायन्स एअरपोर्ट एक्सप्रेस ने दिल्ली एअरो सिटी, धौला कुआ, शिवाजी स्टेडियम करीत नवी दिल्ली गाठले.

१८ किमी फक्त २० मिनिटांत. त्या मंतरलेल्या प्रवासाचे काही व्हिडीओ काढले.

त्या नंतर पहाडगंज भागातील एका हॉटेलात उतरलो. तीनच्या सुमारास जेवलो. थोडी विश्रांती घेतली, संध्याकाळी पहाडगंजच्या आसपासच्या गल्ल्यात भटकलो दिल्लीचे चाट, टिक्की, भल्ल्ले, गोलगप्पे हापले व परत हॉटेलवर आलो. रस्त्यातच पुतण्याने (तो तेव्हा देहरादूनला शिकत होता) फोन करून सांगितले गाझियाबाद ते रानीखेत मार्गाचे नुतनीकरण करणार असल्याने व ते जवळजवळ दोन महिने चालणार असल्याने त्या मार्गावरील गाड्या उशिरा सुटतात. तेव्हा खात्रीकरूनच हॉटेल सोडा. पहाडगंजहून नवी दिल्ली स्थानक जवळ आहे, आम्हाला गाठायचे होते जुनी दिल्ली. दिल्लीच्या स्टेशनचा इन्कायरीचा नंबर सतत बिझी मिळत होता. अखेर रात्री साडेनवाच्या सुमाराला आम्ही जुनी दिल्ली स्थानकाकडे निघालो. इन्कायरी ला कोणीही नव्हते. कुलींना विचारले तर त्यांनी रानीखेत एक्स्प्रेस वेळेवर असल्याचे सांगितले. त्यानंतर बरीच घासाघीस करून आम्ही कुली ठरवले व आमचे अजस्त्र समान त्यांच्या हातगाड्यांवर स्वार झाले. ते पुढे व आम्ही त्यांचा पाठलाग करतोय असे दृश दिसत असावे. अखेर बरेच पूल, स्कॅनर्स ओलांडत त्यांनी आमचे समान फलाट क्रमांक ११ वर टाकले व हुशार कुली आमच्याकडून पैसे घेऊन पसार झाले. आम्ही गाडीची वाट पहात असताना घोषणा ऐकू आली, “ देल्लीसे काठगोदाम जानेवाली ‘रानीखेत एक्स्प्रेस’ अपने पुनर्निर्धारित समय के अनुसार सुबह २.४५ बजे रवाना होगी.” बापरे ! जुनी दिल्ली स्टेशनच्या गलिच्छ फलाटावर पहाटे दोन वाजेपर्यंत बसायचे, ह्या विचारानेच अंगावर काटा आला. आमच्या think tankची तातडीची बैठक फलाटावरच भरली व रानीखेत एक्स्प्रेसची वाट न पहाता मिळेल त्या साधनाने नौकुचीयाताल गाठायचे असे ठरले. हेमंतने लगेचच क्लब महिंद्रला फोन लावून त्यांची एखादी गाडी दिल्लीला आलेली आहे काय हे तपासले, बऱ्याचदा त्यांच्या गाड्या

दिल्लीला पर्यटकांना सोडण्यासाठी येतात व जातांना बहुतेकवेळा रिकाम्याच जातात. परंतु आम्हाला, दिल्लीसाठी गाडी दुसऱ्या दिवशी निघणार असल्याचे समजले. बर दिल्ली स्थानक आणि परिसराची माहिती आमच्यापैकी कोणालाही नव्हती. तेव्हा कोठे काय मिळते, कोठून उत्तराखंडसाठी बस सुटतात वगैरे माहिती कोणालाच नव्हती. अखेर एका पोलिसाने उजव्या बाजूच्या गेटने बाहेर जा, तेथून खासगी बसेस सुटतात किंवा आय एस बी टीहून उत्तराखंडकडे जाणाऱ्या बसेस तेथे येतात. तेथे पहा काही मिळालं तर. असा सल्ला दिला. मग आम्ही आमचा मोर्चा नैनितालकडे जाणाऱ्या खासगी बसवाल्यांकडे वळवला पण छे ! सुमो, क्वालीस, झायलो सगळीकडून नकारच येत होता. हे सारे होत असताना श्रावणीचा आम्ही ज्या हॉटेलात उतरलो होतो त्याच्याशी फोनवर संवाद चालू होता, त्याने गाडी देण्याचे मान्य केले, दर ठरला, अर्धे पैसे आता व उरलेले नौकुचीयाताललला पोहोचल्यावर. साधारणतः ११ च्या सुमारास झायलो आली, आमचे पेटारे गाडीला करकचून आवळून अर्ध्या तासांत आम्ही पुरानी दिल्ली स्थानक सोडून नौकुचीयातालकडे रवाना झालो. रेल्वेच्या कृपेने आम्हाला रात्रीचे जामा मशीद, लाल किल्ला, अक्षरधाम, राजघाट वगैरेंचे धावते दर्शन झाले. आमचे कॅमेरे सामानात बंद असल्यामुळे फोटो काढता आले नसल्याचे दुखः झाले. असो. गाजियाबादच्या पुढे पहाटे एकच्या सुमारास चालक जेवायला थांबला व आम्ही पाय मोकळे करायला गाडीतून उतरलो, तिकडेच 'पेसल चाय' मारके उगीचच तेथे असणाऱ्या दुकानांत फळांचे दर विचारीत हिंडलो. पुढे गंगा नदी ओलांडल्या नंतर ड्रायव्हर वगळता सारे झोपी गेलो. वैशाली – गाझियाबाद पर्यंत वाहनांनी गजबजलेला रस्ता आता मोकळा दिसू लागला हेमंत पुढे बसला होता गाडी एक दोनदा रस्त्याच्या दोनीही कडांना शिऊन आल्याचे त्याला जाणवलं आणि त्याला ड्रायव्हर देखील पेंगुळतोय हे जाणवलं, बर आम्ही कोठे आहोत हे समजत नव्हते, आम्हाला अनोळखी अशा निर्जन अशा रस्त्यात आमचीच गाडी चालली होती. ना पुढे कोणी ना मागे, समोरूनही एकही वाहन येताना दिसत नव्हते. तेव्हा एका ए टी एम जवळ गाडी लावली व सारे झोपी गेलो. अर्ध्या - पाऊण तासाने चालक फ्रेश झाला व आम्ही निघालो. पुन्हा पाचच्या सुमारास आम्ही असेच तास-दीड तास थांबलो.



***<u>नौकुचीयातालच्या मार्गावर पहाटे</u>***

सकाळी हलद्वानी गावात एक बरे से हॉटेल पाहून चहा नाश्त्याला थांबलो ( योगायोग असा की परतीच्या प्रवासात त्याच हॉटेलात आम्ही चहा नाश्त्या करिता थांबलो होतो ). पुढे, पंत नगर, काठगोदाम करीत सकाळी नऊ – साडे नऊच्या सुमारास आम्ही नौकुचीयाताललला पोहोचलो. दुसऱ्या

दिवशी संध्याकाळी रानीखेत एक्सप्रेस ज्यावेळी आम्ही नौकुचीयातालमध्ये पोहोचलो तेव्हा दिल्लीहून निघून सायंकाळी काठ्गोदाम येथे पोहोचल्याचे समजले.







*डान्सिंग वाटर रेसोर्ट, नौकुचीआताल*

रिसॉटवर पोहोचलो तेथे आमचे पारंपारिक पद्धतीने स्वागत केले गेले. खोल्यांवर पोहोचताच आम्ही सारे झोपी गेलो ते दीडच्या सुमारास उठलो ते 'जेवायला चला' च्या फोन ने. गरमागरम जेऊन. पुन्हा थोडा आराम केला. तसा आमचा एक दिवस वाया गेलाच होता. तत्पूर्वी रिसोर्टमध्ये असणाऱ्या रंगीबेरंगी फुलांनी आमचे स्वागत केले.











संध्याकाळी भीमताल पाहायला गेलो, तेथील तलावात भीमाने स्नान केल्याची आख्यायिका आहे. तेथून पुढे सातताल ला पोहोचलो, सात ताल म्हणजे सात तलाव नैसर्गिकरीत्या एकमेकांना जोडले गेले आहेत. तेथे छोट्या नावेतून पॅडल मारत मनसोक्त हुंदडलो व सुर्य मावळताच परतलो. रिसॉर्टवर येऊन पाहतो तो काय दरवाज्यात फुलांनी शुभ दीपावली लिहिलेलं. लाकडी जिन्याच्या प्रत्येक पायरीवर पणती तेवत होती. बाहेर गुलाबी थंडी पडली होती. निसर्गाने व क्लब महिंद्रने दीपावलीची वातावरण निर्मिती छानच केली होती.



दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम ठरवण्यासाठी हेमंत, अतुल व मी ट्रॅव्हल डेस्क ला गेलो आमचा रानी खेत करण्याचा विचार होता तर, त्यापेक्षा मुक्तेश्वर (महादेवाचे स्थान) पाहून या, रस्त्यात संपूर्ण जंगल आहे व रस्त्यातून धुक नसल्यास हिमालयातील नंदा देवी – त्रिशूल या हिमशिखरांच दर्शन होईल असा सल्ला आम्हाला दिला. ठीक आहे, परवा आम्ही मुक्तेश्वरला जाऊ, असे म्हणून आम्ही परवा सकाळी मुक्तेश्वर साठी गाडी सांगितली.

दुसरा दिवस आम्ही नैनितालसाठी राखून ठेवला होता.

नैनिताल ते नौकुचीयाताल २६ किलोमीटर्सचे अंतर, डोंगराळ रस्ता म्हणून सकाळीच न्याहरी करून निघालो. रस्त्यात पँथर केव्ह ला थांबलो. तिकीट काढून आत गेलो, गुहा कोठेच दिसे ना. एका टेकडीच्या पायथ्याशी विविध प्रकारच्या फुलांनी बहरलेली फुलझाडं





असणारा बगीचा मात्र दिसला. टेकडी चढून जाताच वर एके ठिकाणी पँथर केव्ह लिहिलेलं पाहिलं आणि आत शिरलो. दोन मोठ्या शिळांच्या मधून अरुंदशा जागेतून ( कसा पँथर फिरत असेल कुणास ठाऊक ).






टायगर केव्हमध्ये शिरताना मला मध्य प्रदेशातील पचमढी जवळ गुप्त महादेवची आठवण झाली, तेथे अशाच अरुंद कपारीतून प्रवेश करावा लागतो.

तेथून आम्ही नैनिताल कडे रवाना झालो. जाताना रस्त्यावरून दिसलेले दृश्य






नयना देवी मंदिराच्या शेजारील तलाव म्हणजे नैनिताल.सकाळच्या नाश्त्यानंतर पोटात काही नव्हत. भुकेमुळे असेल कदाचित पण आता आम्हाला थंडी चांगलीच जाणवायला लागली होती. नैनितालचा मुख्य रस्ता हा मोटार वाहतुकीसाठी दुपारी चार नंतर बंद होतो . तेव्हा जे काही पहायचे , खरेदी करायचे ते त्या आधी. सर्वप्रथम पुरोहितच्या हॉटेलात आलू टिक्की, आलू - छोले , छोले - पुडी, छोले – भटुरे वगैरेंवर ताव मारत उदर शांती केली. तेथून रोप वे ने नैनितालच्या शेजारी असणाऱ्या टेकडीच्या टोकावर गेलो. वर खूपच थंडी होती. आणि आमचे स्वेटर्स गाडीत होते. वरून आजूबाजूच्या पर्वतरांगांचे दृश्य पाहण्यासारखे होते.


10.2011 12:44




नैनितालच्या मॉल रोडवर खरेदी करून ( कारण दुपारी चार नंतर मॉल रोड वाहनांना बंद होतो) आम्ही रिसॉर्टवर परतलो.






***<u>आमच्या खोल्यांवर टॉवेल्स अशा पद्धतीने मांडलेले होते.</u>***

खोल्यांच्या किल्ल्या घेताना स्वागतिकेने ७.३०वाजता पहिल्या मजल्यावरील 'फन झोन' मध्ये येण्याचे निमंत्रण दिले. संध्याकाळी 'फन झोन'मध्ये विविध खेळांचे आयोजन केले होते. त्या निमित्ताने सहपर्यटकांची ओळख झाली. कार्यक्रम बराचवेळ चालणार होता. अखेर नऊच्या सुमारास आम्ही रात्रीच्या भोजनासाठी तेथून काढता पाय घेतला. तेथून निघताना आम्हाला उद्या संध्याकाळी याचं ठिकाणी लक्ष्मी पूजनाला जमण्याचे आग्रहाचे निमंत्रण देण्यात आले.

– – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – – –




आज नरक चतुर्दशी तेव्हा सकाळीच अभ्यंग (!) स्नान करून दिवाळीचा फराळ केला. आणि दहाच्या सुमारास आम्ही मुक्तेश्वरचा रस्ता धरला. मुक्तेश्वर नैनिताल पासून ५१ किलोमीटर्स अंतरावर आहे. तेथे ३५० वर्ष जुने शिवमंदिर आहे. संत मुक्तेश्वर महाराज यांचे या परिसरात वास्तव्य होते म्हणून या भागाला मुक्तेश्वर म्हटले जाते. महाराजांची समाधी तेथेच आहे. त्याभागात भारत सरकारच्या विविध संस्था ( Indian Veterinary Research Institute, Central Institute of Temperature, Horticulture-Regional Station ) आहेत. रस्त्याच्या दुतर्फा देवदाराचे प्रचंड वृक्ष आजूबाजूला हिरवी गर्द झाडी, वळणावळणाचे रस्ते. आजमात्र आम्ही स्वेटर्स – शाली घेऊन निघालो होतो. मुक्तेश्वरच्या वाटेवरचे काही फोटो देतो आहे त्यावरून वाचकांना अंदाज यावा. या वाटेवर काही ठिकाणी झेंडूच्या फुलांनी भरलेली झाडं फुलपाखरांसह दिसली.





***आणि मुक्तेश्वरच्या वाटेवरून दिसणारी हिमशिखरे.***


26.10.2011 12:21





<u>*मुक्तेश्वर मंदिराजवळून दिसणारा नजारा तर भन्नाट होता.*</u>





मुक्तेश्वर मंदिर छोटेसेच होते.

संध्याकाळी दिवेलागणीच्या सुमारास आम्ही फन झोनच्या सभागृहात जमलो.




गुरुजींनी पूजा सांगितली, मिठाई वाटली गेली आणि साऱ्या पर्यटकांना नवनवीन खेळ खेळण्यासाठी पर्यटकांना बोलावण्यात आलं.





त्यानंतर खाली मुख्य दरवाज्यापाशी फटाक्यांच्या आतषबाजीसाठी येण्याचे सांगण्यात आले. लहानथोरांनी फटाक्याचा आनंद घेतला. एकंदरीत आजचा दिवसाची सांगता छान झाली.



२७ तारखेला नुकतच फटफटू लागल्यावर म्हणजे सकाळी सातच्या सुमारास आम्ही रिसॉर्टच्या आजूबाजूच्या परिसर सोबत एक वाटाड्याघेऊन पायी हिंडण्यास छोटासा ट्रेक म्हणाना , करण्यास निघालो. रिसॉर्टच्या मुख्यदारामधून बाहेर पडल्यावर शहराकडे जाण्यासाठी डावीकडे रस्ता होता तर आम्ही उजव्याबाजूला वळून रिसॉर्टच्या मागील बाजूला जाऊलागलो. रस्त्याबाजूच्या उतारावर अधूनमधून टुमदार बंगले दिसत होते. बहुतेक बंगल्यांचे मालक भारतीय सेनादलांतून निवृत्त झालेले होते.  आता आम्ही रस्त्याच्या उजव्याबाजूला क्रॉसकंट्री जाऊ लागलो. मोकळ्या शेतातून जातांना सकाळचा गारवा जाणवू लागला.




नौकुचीयातालच्या नितळ पाण्यात शेजारील डोंगर (टेकडी नव्हे) आपली छबी न्याहाळताना.




वाटाड्यासोबत बोलत बोलत आमच्या शेजारचे मोकळ्या मैदानाची जागा गर्द झाडीने केव्हा घेतली हे समजलच नाही. मध्येच तीव्र चढ तर मध्येच अतितीव्र उतारावर आम्ही अधूनमधून साखळी करून चढत – उतरत होतो. आमचा वाटाड्याही आम्हा मुंबईकरांची गम्मत (की फजिती) पहात होता. अखेर आम्ही एका  पाणवठ्या समोरच्या मोकळ्या जागी आलो.



त्या जागेत बरीचशी पोती ठेवली होती व समोरच उंचावर तंबू बांधलेले होते. या भागात उन्हाळ्यात विविध ॲडव्हेन्चरस खेळांचे प्रशिक्षण दिले जाते. त्या पाण्यावरील तरंगांचा स्वरालीला एक छानसं छायाचित्र मिळालं.




तेथून पुढे रस्त्यात एक छानसा बगीचा लागला. विविध झाडं, फुलं पहात साधारणतः पावणे नऊच्या सुमारास आम्ही आमच्या खोल्यांवर परतलो. दुपारच्या भोजनाच्या वेळी रेस्तोराँच्या कर्मचाऱ्याना पाच – साडेसातच्या सुमारास तयार राहण्यास सांगितले.




No Smoking Area –
27.10.2011 19:41

गेले चार दिवस सकाळ संध्याकाळ आमच्या जिभेचे चोचले पुरवणाऱ्या बल्लवाचार्यांचे आभार मानून त्यांच्यासोबत एक सामूहिक छायाचित्र काढलं. एक प्रकारची कृतज्ञता त्यांच्या डोळ्यात दिसली. देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले हे कर्मचारी या छोट्याश्या कृतीने खूप सुखावले. आणि आमच्या सहलीच सार्थक गाडी आली. घाट उतरून आल्यावर काठगोदाम, साडेसातच्या सुमारास हलद्वानी, पुन्हा २४ तारखेला ज्या हॉटेलात नाश्ता केला तेच आताही उघडले होते. पुन्हा त्याच जागी बसून उपहार केला... पंत नगरचा टाटा मोटर्सचा कारखाना. चार दिवसापूर्वी असाच सकाळच्यावेळी पहिल्या पाळीला जाणारा कामगारवर्ग दिसला होता..... जाताना रात्री झोपेत पार केलेला गंगा नदीवरचा पूल भर दुपारी वेगळाच दिसला.... मेरठ शहर... गाझियाबाद ... अक्षरधाम, शांतिवन, फिल्म उलगडावी तशी तीच दृश्य परतीच्या मार्गावर दिसत होती. दुपारी तीनच्या सुमारास आम्ही नवी दिल्ली स्थानकावर पोहोचलो.





अखेर आम्ही २८तारखेच्या राजधानी एक्स्प्रेसने दिल्लीहून निघून २९ तारखेला सकाळी मुंबईत पोहोचलो. सुरुवातीला अडचणी निर्माण करणाऱ्या प्रवासाचा शेवट सुखद झाला.

esahity@gmail.com

जग सुंदर आहेच. पण त्याचे सौंदर्य खुलवणारे शब्द व दृष्टी आपल्याला लेखक अणि कवी देतात. केशवसुत म्हणतात

**पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती द्यावया –**

**सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादु करांमजि या;**

लेखकांच्या आणि कवींच्या शब्दस्पर्शाने आम्हाला आमच्या आजूबाजूच्या निसर्गातले आणि निर्जीव दगडांतले, पाण्यातले सौंदर्य “जाणवू” लागले. प्रवासवर्णने वाचून आपलेही पाय शिवशिवायला लागतात, त्यांनाही ओढ लागते त्या त्या दिशांची, त्या त्या देशांची.

ई साहित्यचा प्रवासवर्णन विभाग काहींच्या मते खूप समृद्ध आहे. जगातले अनेक देश, भारतातली अनेक राज्ये आणि महाराष्ट्रातले अनेक जिल्हे आणि किल्ले यांची सखोल आणि सचित्र माहिती देणारी भरपूर पुस्तके ई साहित्यने प्रकाशित केली. पण आम्ही अजिबातच समाधानी नाही. महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या “मी पाहिलेला...” सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

आपण जिथे कुठे प्रवास केला असेल, त्याचं वर्णन द्या.

आपण आपल्या गावाचं वर्णन द्या.

आपण आपल्या आवडत्या कोणत्याही गावाचे, किंवा जिल्ह्याचे वर्णन द्या.

आपलं आजोळ असो वा माहेर किंवा सासुरवाडी, आम्हाला त्याचा महिमा कळवा.

आणि हो, सोबत भरपूर फ़ोटो पाठवा.

तुम्ही पाठवलेली माहिती एखाद्या प्रवाशाला आकृष्ट करेल

किंवा ज्यांनी आधीच प्लॅन केला त्यांना मार्गदर्शक ठरेल

किंवा ज्यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरता येत नाही त्यांना सहलीचा आनंद देईल

किंवा परदेशात राहून भारतावर प्रेम करणाऱ्या बंधू भगिनींना आपल्या देशाच्या कोना कोपऱ्याचं दर्शन घडवेल. कृपया लिहा

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com